दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.३ जून २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६७ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 3 June 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 267 | Pages 4 | Rate 4 Rs




# पंतप्रधान कमकुवत असल्यानेच पेपरफुटी; धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा : उदय भानू चिब

## NEET आणि CBSE परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि घोटाळ्यांच्या निषेधार्थ युवक काँग्रेसचा भव्य मोर्चा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

छएएढ आणि उइडए परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि घोटाळ्यांच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबई युवक काँग्रेसच्या वतीने आज दादर येथे भव्य युवा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनी आयोजित केलेल्या या मोर्चाचे नेतृत्व युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांनी केले. चैत्यभूमी, दादर येथून शिवाजी पार्क येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आलेला हा मोर्चा पोलिसांनी अडवला आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या मोर्चात काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री नसीम खान, आ. भाई जगताप, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव सचिन सावंत यांच्यासह शेकडो विद्यार्थी, युवक आणि काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले होते. (यावेळी बोलताना युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य आज धोक्यात आले असून परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे




विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांच्या अपेक्षा धुळीस मिळत आहेत. केंद्र सरकार या गंभीर प्रश्नावर अपयशी ठरले असून पंतप्रधान कमकुवत असल्यानेच देशभरात पेपरफुटीचे रॅकेट फोफावत आहेत. शिक्षण व्यवस्थेतील या अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी मंत्री नसीम खान यांनीही केंद्र सरकारवर निशाणा साधताना म्हटले की, विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या पेपरफुटीच्या घटना हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा विषय नसून शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा परिणाम आहे. देशातील युवकांमध्ये प्रचंड असंतोष असून सरकारने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

आ. भाई जगताप सरकारवर टीका करताना म्हणाले की, एकीकडे सरकार युवकांना मोठमोठी स्वप्ने दाखवत आहे, तर दुसरीकडे त्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या घोटाळ्यांवर कारवाई करण्यात अपयशी ठरत आहे. पेपरफुटी करणाऱ्या टोळ्यांना राजकीय संरक्षण मिळत आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे.अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव सचिन सावंत यांनी सरकारवर जोरदार टीका केली, ते म्हणाले की देशातील परीक्षा व्यवस्था ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आधारित असली पाहिजे. मात्र आज पैशांच्या आणि गैरव्यवहारांच्या जोरावर काही जण विद्यार्थ्यांचे भविष्य हिरावून घेत आहेत. सरकारला विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबद्दल कोणतीही संवेदनशीलता राहिलेली नसून युवकांच्या न्यायासाठी काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरला आहे.या आंदोलनादरम्यान विद्यार्थी आणि युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पेपरफुटी बंद करा, विद्यार्थ्यांना न्याय द्या, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करून परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी करून मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन म्हणाल्या की, देशातील विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत आणि पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच राहणार आहे.

# आगामी पावसाच्या सुरुवातीला बीड शहरातील सर्व ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवा

## एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे नगरसेवक बीड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

येणाऱ्या पुढील आठ ते दहा दिवसांपूर्वी बीड शहरातील मान्सून पूर्व नदी नाले साफसफाई मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात यावी, तसेच सध्या बीड शहरामध्ये होणारी पाणीटंचाई दूर करण्यात यावी काही ठिकाणी बिन शहरातील असलेली पाईपलाईन लिकेज असलेली पाईपलाईन दुरुस्त करण्यात यावी त्यामधून येणारे पाणी बऱ्याच ठिकाणी फुटलेल्या पाईपलाईन दुरुस्ती, तसेच विद्युत खांबावरील असलेल्या बंद लाईटी तसेच दुरुस्ती बाबत, तसेच कोणताही जातीभेद न करता कोणताही बेल्ट न बघता, मग ग्रीन बेल्ट असो, ऑरेंज बेल्ट, की ब्लू बेल्ट, हिंदू मुस्लिम बौद्ध सर्व बेल्ट मध्ये जातीपाती न पाहता, सर्व धार्मिक स्थळे, शाळा , व ज्ञान मंदिर या ठिकाणी असलेले बीड शहरातील विकासात्मक सर्व कामे पूर्ण करावीत अशी मागणी बीड नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मा मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड मा श्री शैलेश




जी फडसे साहेब नगरपरिषद बीड यांच्याशी सकारात्मक बीड शहरातील सर्व विकासाच्या बाबतीमध्ये चर्चा नगरसेवक एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे यांनी केली ड.गोविंद भैया शिराळे यांच्यासमवेत बीड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिकारी साहेब यांना आपल्या ज्या बीड शहरातील विकासाच्या बाबतीत ज्या मागण्या आहेत त्या मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या होत्या याची दखल तात्काळ घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जी फडशे साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची दखल घेऊन बलगुजर परिसरातील जिजाऊ नगर, तिरुपती नगर, शिवाजीनगर, स्वराज्य नगर, खोल वाट, शिराळे नगर, सावता नगर, धांडे नगर, राजमुद्रा नगर, सोमेश्वर नगर या सर्व परिसरात आज नगरपरिषद प्रशासनाने स्वच्छता मोहीम सुरू केली असून बीड नगरपरिषद कर्तव्यदक्ष चे मुख्य धिकारी शैलेश फडसे साहेब यांचे आभार व्यक्त केले यावेळी नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे, व सहकारी नगरसेवक नंदकिशोर पिंगळे व समस्त भागातील नागरिक मोठ्या संख्येने दिसून आले.

# देऊळगाव राजा-सिंदखेड राजा परिसरात आकाशातील रहस्यमय वस्तूंनी वेधले लक्ष!

## दिवसभर दिसणाऱ्या ड्रोनसदृश उड्डाणांमुळे नागरिकांमध्ये उत्सुकता; प्रशासनाच्या स्पष्टीकरणाची प्रतीक्षा

दैनिक वादळ वार्ता
**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

देऊळगाव राजा आणि सिंदखेड राजा तालुक्यातील विविध गावांच्या आकाशात गेल्या काही दिवसांपासून दिवसभर काही उड्डाण करणाऱ्या वस्तू फिरताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वस्तू विमानासारख्या किंवा ड्रोनसदृश असल्याचे अनेक नागरिकांचे म्हणणे असून, त्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने चर्चांना उधाण आले आहे.स्थानिकांच्या माहितीनुसार१ जुन च्या सकाळपासून सायंकाळपर्यंत आकाशात विशिष्ट दिशेने फिरणाऱ्या काही वस्तू अनेकदा दिसून येत आहेत. काही नागरिकांनी त्या ड्रोन असाव्यात असा अंदाज व्यक्त केला आहे, तर काहींना त्या सर्वेक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या तांत्रिक यंत्रणा अथवा इतर प्रकारच्या उड्डाण करणाऱ्या वस्तू असाव्यात असे वाटत आहे. मात्र या सर्व बाबी सध्या केवळ अंदाजांवर आधारित असून कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

ग्रामीण भागात या विषयाची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू असून सामाजिक माध्यमांवरही विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत. त्यामुळे वस्तुस्थिती काय आहे, याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. विशेष म्हणजे या कथित उड्डाणांबाबत महसूल विभाग, पोलीस प्रशासन किंवा इतर कोणत्याही संबंधित विभागाकडून अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नसल्याचे समोर आले आहे.या संदर्भात देऊळगाव राजा तहसील कार्यालयाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ न शकल्याने प्रशासनाची भूमिका समजू शकली नाही. त्यामुळे या वस्तूंचे स्वरूप, त्यांचा उद्देश आणि त्या कोणाच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहेत, याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे.नागरिकांनी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी आणि संबंधित वस्तूंबाबत अधिकृत माहिती जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. जर या वस्ती शासकीय सर्वेक्षण, कृषी निरीक्षण, नकाशांकन किंवा इतर कोणत्याही अधिकृत कामासाठी वापरल्या जात असतील, तर त्याची माहिती सार्वजनिक करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.दरम्यान, कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसताना अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही सुजाण नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाकडून वस्तुस्थिती स्पष्ट झाल्यास नागरिकांमधील संभ्रम दूर होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले जात आहे.सध्या मात्र देऊळगाव राजा आणि सिंदखेड राजा परिसरात आकाशात दिसणाऱ्या या रहस्यमय वस्तूंचीच चर्चा रंगली असून प्रशासनाच्या अधिकृत स्पष्टीकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नांदेड-लातुर रेल्वे मार्ग पालम तालुक्यातील सिपेगाव व चारवड मार्ग वळविण्याचा घाट लो ह्यातील स्थानिक आमदार मुग गिळुन गप्प का-प्रा.मनोहर धोंडे यांचा सवाल



दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

नांदेड - लातुर रेल्वे मार्ग लोहा -माळाकोळी - माळेगाव सुरू व्हावी म्हणून मी शिवा संघटनेच्या वतीने न्यायालयात याचिका दाखल केली असल्यामुळे तात्कालीन रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांच्या कार्यकाळात नांदेड -लातुर रेल्वे मार्ग लोहा -माळाकोळी -माळेगाव अशी रेल्वे ट्रॅक मंजुर केला पण आता सदरील रेल्वे मार्ग लोहा तालुका सोडून पालम तालुक्यातील सिपेगाव व चारवड मार्ग वळविण्याचा घाट चालला असुन याकडे लोहा मतदार संघाचा स्थानिक आमदार मुग गिळुन गप्प का? असा सवाल शिवा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे यांनी लोहा येथे पत्रकार परिषदेत केला.

तसेच पुढे बोलताना शिवा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे यांनी लोहा मतदार संघाचे स्थानिक आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यावर चौफेर टीका केली.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे जातीवादी आहेत असा आरोप केला. तसेच पुढे बोलताना प्रा.मनोहर धोंडे म्हणाले की,लोहा येथील महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाचे काम बंद पाडले,लोहा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विरोध करुन बौध्द समाजात गटबाजी पाडली.कंधार येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांचे राजकारण करुन मातंग समाजात दोन गट पाडले. ते व त्यांचे कार्यकर्ते म्हणतात की, मोर्चा काढल्याने काय होते. भारतीय संविधानाने परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक माणसाला मोर्चा काढण्याचा आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. महात्मा गांधीने जर आंदोलन, सत्याग्रह केला नसता तर देशाला स्वातंत्र्य मिळाले असते का ? मनोज जरांगेना हे म्हणू शकतात का तुम्ही आंदोलन करु नका, आंदोलन केल्याने काय होते.

नांदेड -लातुर रेल्वे ही सोनखेड,लोहा ,माळाकोळी, माळेगाव, अहमदपुर,चापोली,चाकुर,ते लातुर झाली पाहिजे यासाठी मी दि. १८ मे २०२६ रोजी रेल्वे मंडळाचे चेअरमन सतीशकुमार यांच्याशी चर्चा करुन निवेदन दिले व दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेसाठी रेल्वे ट्रॅक झाला पाहिजे असे प्रा. मनोहर धोंडे म्हणाले. तसेच लोहा न.प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मिडियाद्वारे तुमच्यावर टीका केली होती यावर आपली प्रतिक्रिया काय असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता प्रा. मनोहर धोंडे म्हणाले की,मी आशा छोट्या माणसाला कवडीची किंमत देत नाही. मागे त्यांना एका हॉटेलवर लाकडाच्या धिपल्यांनी महिलांनी प्रसाद दिला होता असे प्रा. मनोहर धोंडे म्हणाले.



# संपादकीय

## कोकण विकासाच्या वाटेवरील अडथळे

कोकणातील विकास, पर्यटन आणि राजकीय चर्चांच्या पार्श्वभूमीवर अफवा, बुद्धिभेद आणि पक्षीय भूमिकांमुळे निर्माण होणारे गोंधळ यामुळे प्रत्यक्ष विकास प्रक्रियेला अडथळा येतो, असे चित्र दिसते. प्रकल्पांवरील विकासकल्पनांवरही पुरेशी मोकळी चर्चा होत नाही. मात्र कोकणातील पर्यटन हा भविष्यातील आर्थिक विकासाचा महत्त्वाचा आधार ठरू शकतो. गोव्याच्या तुलनेत देश-विदेशातील पर्यटकांचा ओढा येथे वाढत आहे. त्यामुळे विकासाबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे ही आजची गरज आहे.अफवा आणि बुद्धिभेद यांचा प्रभाव जनमानसावर इतका खोलवरकेला जातो की त्यातून बाहेर पडून चांगले-वाईट याचा विवेकी विचार करणेही अनेकांना कठीण होऊन बसते. यासाठी विविध राजकीय पक्षांतील काही नेते जाणीवपूर्वक प्रयत्न करत असल्याचे चित्र दिसते. याचा परिणाम असा होतो की कोकण विकासाच्या मुद्द्यावर अपेक्षित प्रगती होत नाही,ही वस्तुस्थिती आहे. एखाद्या प्रकल्पाबाबत जर कोणी सकारात्मक भूमिका मांडली, तर त्या व्यक्तीला लगेचच सत्ताधाऱ्यांचा समर्थक ठरवले जाते. दुसरीकडे, कोणत्याही प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांपैकी किती जण प्रत्यक्षात नवीन आणि पर्यायी विकासकल्पनांसाठी सक्रियपणे काम करतात, हा प्रश्न उपस्थित होतो. बहुतांश वेळा अशा प्रयत्नांचा अभावच दिसतो. कोकणात विनाशकारी प्रकल्प येऊ नयेत, याबाबत कोणाचाही विरोध नाही.मात्र कोणताही प्रकल्प येण्यापूर्वीच चर्चेचे दरवाजे बंद करणे आणि नंतर कोकणात काहीच होत नाही अशी भूमिका घेणे ही राजकीय दुटप्पीपणा ठरतो. या दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. विचारपूर्वक चर्चा, पारदर्शकता आणि विकासाच्या पर्यायांवर खुला संवाद याची गरज आहे. आजच्या घडीला जगभरात पर्यटन व्यवसाय अतिशय वेगाने वाढत आहे. त्यामुळे पर्यटनातून आर्थिक समृद्धीची स्वप्ने साकार होऊ शकतात, हे स्पष्ट दिसते. कोकणाला निसर्गाने भरभरून सौंदर्य दिले आहे. म्हणूनच कोकणचे 'कोकणपण' जपणे आणि पर्यटन व्यवसायासाठी आवश्यक असलेली सकारात्मक मानसिकता निर्माण करणे गरजेचे आहे. कोकणाला लागून असलेल्या गोवा राज्यात देश-विदेशातून मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात.मात्र गेल्या काही वर्षांत गोव्यात पर्यटकांना मिळणारी वागणूक, तसेच काही ठिकाणी होणारी लूटमार याबाबत पर्यटकांमध्ये नाराजी दिसते. याच्या तुलनेत कोकणातील किनारपट्टी अधिक शांत, मोकळी आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेली आहे. कोकणातील समुद्रकिनारे गोव्यापेक्षाही अधिक स्वच्छ आणि सुंदर असल्याचे अनेक पर्यटकांचे मत आहे. त्यामुळे देशभरातील तसेच परदेशी पर्यटकांचा ओढा कोकणाकडे वाढू लागला आहे. कोकणातील पर्यटन व्यवसायातून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळू शकतो, ही बाब आजपर्यंत पुरेशा गांभीर्याने विचारात घेतली गेली नाही. पश्चिम महाराष्ट्रासह उर्वरित महाराष्ट्राने कोकणाला अनेकदा दुर्लक्षित केले आहे, असेही दिसते. १९९७ साली कोकणातील पर्यटन विकासाचा विचार प्रथम करण्यात आला. त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्याला देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले. तेव्हापासून कोकणातील निसर्गसौंदर्य आणि पर्यटन क्षमतेची अधिक जाणीव होऊ लागली आहे. निसर्गाने कोकणाला जे वैभव दिले आहे, त्याची खरी जाणीव कोकणालाच पुरेशी झाली नाही असे म्हणावे लागते. र्यटन व्यवसाय हा कोकणाच्या विकासासाठी एक मोठे वरदान ठरू शकतो आणि याच क्षेत्रातून आर्थिक सक्षमतेचा मार्ग खुला होऊ शकतो, ही कल्पना दीर्घकाळ स्पष्टपणे मांडली गेली नाही. 'कोकणचा कॅलिफोर्निया' हे स्वप्न अनेक वर्षे चर्चेत राहिले. या दिशेने पहिल्यांदा ठोस विचारांना चालना देण्याचे काम १९९७ साली तत्कालीन खासदार नारायण राणे यांच्या प्रयत्नांतून झाले. त्यानंतर कोकणातील पर्यटनाबाबत अधिक चर्चा सुरू झाली. त्यापूर्वीच रायगड जिल्ह्यात काही प्रमाणात औद्योगिकीकरण सुरू झाले होते आणि उद्योगांनी आपले पाय रोवले होते. याचबरोबर रायगडच्या किनारपट्टीवर पर्यटन व्यवसायही हळूहळू वाढत गेला. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक पर्यटनस्थळांवर वर्षभर मोठ्या प्रमाणावर पर्यटक येऊ लागले आणि पर्यटनाला वेगळी गती मिळाली.रत्नागिरी जिल्ह्यातील काही भागांत औद्योगिकीकरण झाले आणि उद्योग उभे राहिले, मात्र त्याचा अपेक्षित मोठा फायदा स्थानिक तरुणांना झाला असे म्हणता येत नाही. उत्तर रत्नागिरीत काही उद्योग स्थापन झाले, परंतु मर्यादित स्वरूपातच औद्योगिक विकास झाला आणि त्याचा विस्तार ठराविक मर्यादेपलीकडे जाऊ शकला नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्याची परिस्थितीही काहीशी अशीच आहे. तेथे पर्यटन जिल्हा म्हणून विकास करण्याची संकल्पना मांडली गेली, परंतु प्रत्यक्षात त्या दिशेने अपेक्षित वेगाने प्रगती होऊ शकली नाही.रत्नागिरीमध्ये फलोद्यान आणि प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून विकास साधण्याचा तसेच रायगड जिल्ह्याचा औद्योगिकीकरणातून विकास करण्याचा विचार खासदार नारायण राणे यांनी राज्यात मंत्री असताना मांडला होता. त्या दिशेने काही प्रयत्नही झाले. मात्र कोकणाचा चेहरा बदलू शकणाऱ्या 'सी वर्ल्ड'सारख्या प्रकल्पालाही राजकीय विरोधाचा सामना करावा लागला. आजही कोकणात येणाऱ्या अनेक विकास प्रकल्पांना केवळ राजकारणातून विरोध होताना दिसतो. काही वेळा अफवा आणि गैरसमज पसरवून जनमानसात संभ्रम निर्माण केला जातो, ज्यामुळे चांगल्या-वाईटाचा विचार करण्याची मोकळीक कमी होते. विविध राजकीय पक्षांतील काही नेत्यांकडून अशा प्रकारे सातत्याने प्रयत्न होत असल्याचा आरोप केला जातो. परिणामी कोकणाचा विकास अपेक्षित गतीने होताना दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. एखाद्या प्रकल्पाबाबत सकारात्मक मांडणी केली तर ती मांडणारी व्यक्ती लगेचच सत्ताधाऱ्यांची समर्थक ठरवली जाते.दुसरीकडे, जे प्रकल्पांना विरोध करतात त्यापैकी किती जण स्वतःहून नवीन विकास प्रकल्प पुढे आणण्यासाठी प्रयत्न करतात, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. अनेकदा केवळ विरोधासाठी विरोध अशी भूमिकाच दिसून येते. विकासाविषयीची चर्चा सुरू होण्यापूर्वीच ती दडपली जाते आणि मग कोकणात काही होत नाही अशी टीका केली जाते. ही भूमिका दुटप्पी ठरते. पर्यटन विकासाच्या क्षेत्रात कोकणने अलीकडच्या काळात काही प्रमाणात प्रगती केली आहे, हेही मान्य करावे लागते. मात्र ही प्रगती अधिक व्यापक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने वाढवण्याची गरज आहे.कोकणातील निवती रॉक येथे 'गुलदार' युद्धनौका समुद्रात स्थिर करण्यात यश आले. भारतातील हा पहिलाच प्रयोग. पर्यटन विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सागर विज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कोकणच्या पर्यटन क्षेत्रात हे एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जगात अमेरिकेतील फ्लोरिडा आणि ऑस्ट्रेलियातील एमएमएएस स्पॅन यांसारखे समुद्रतळाशी कृत्रिम रीफ तयार करणारे प्रकल्प यापूर्वी राबविण्यात आले आहेत. आपण नकारात्मकतेऐवजी सकारात्मक दृष्टिकोनातून याकडे पाहिले, तर निश्चितच कोकणातील पर्यटन वाढेल आणि त्याचबरोबर कोकणाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एक नवा मार्गही यातून निर्माण होईल.

# महायुतीच्या सर्व १७ जागांवर विजय निश्चित

## ठाण्यातून रवींद्र फाटक प्रचंड मताधिक्याने विजयी होतील

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला ठाम विश्वास



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार रवींद्र फाटक यांनी आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यापूर्वी त्यांनी आणि महायुतीमधील सर्व घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी ठाण्यातील टेंभी नाका येथील आनंदआश्रमात जाऊन स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि स्वर्गीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे अभिवादन केले. यावेळी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार माधवी नाईक, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रमोद हिंदुराव,आमदार कुमार आयलानी आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के तसेच शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी रिपाइंचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रतिसादामुळे रवींद्र फाटक यांचा विजय निश्चित असून ते प्रचंड मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना शिंदे म्हणाले की, संबंधित मतदारसंघांमध्ये महायुतीचे प्राबल्य असून बहुमतही महायुतीकडे आहे. त्यामुळे ही निवडणूक महायुती मोठ्या मताधिक्याने जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला निवडणूक लढविण्याचा अधिकार असल्याचे सांगत त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांवरही भाष्य केले. ठाणे-पालघरपुरतेच नव्हे, तर महाराष्ट्रातील सर्व १७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील, असा दावा त्यांनी केला.महायुतीमधील काही ठिकाणच्या बंडखोरीबाबत विचारले असता शिंदे म्हणाले की, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ तारखेपर्यंत आहे. महायुतीचे सर्व पदाधिकारी एकत्र बसून याबाबत योग्य निर्णय घेतील. ज्यांनी उमेदवारी अर्ज भरले असतील, ते माघार घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येण्याबाबत केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना शिंदे म्हणाले की, आम्ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर पुढे चाललो आहोत. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या मनातील सरकार आम्ही स्थापन केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही जनतेने शिवसेना, धनुष्यबाण चिन्ह, बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांना आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे आगामी काळातही आमचा विजयाचा झेंडा कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर अनंता कचेर ठाकूर यांचा सन्मानपूर्वक निरोप



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

सिडको महामंडळात निवड श्रेणी वाहन चालक म्हणून तब्बल ३१ वर्षे प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने सेवा बजावणाऱ्या अनंता कचेर ठाकूर यांचा सेवा निवृत्ती सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

दि. २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता हनुमान ग्राम विकास मंडळ समाज मंदिर, कोपरा गाव, सेक्टर-१०, खारघर, नवी मुंबई येथे आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नातेवाईक, मित्रपरिवार, सिडकोचे कर्मचारी, हितचिंतक आणि मान्यवर उपस्थित होते.

अनंता कचेर ठाकूर यांनी आपल्या ३१ वर्षांच्या सेवाकाळात कामाला केवळ नोकरी न समजता कर्तव्य म्हणून स्वीकारले. प्रामाणिकपणा, शिस्त, वरिष्ठांप्रती आदर आणि सहकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांनी सिडको महामंडळात वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या कार्यपद्धतीचे अनेकदा कार्यालयात कौतुक करण्यात आले होते.या सन्मान सोहळ्यास समाजसेवेचा वसा घेतलेले अर्जुन गरड, खारघर फोरमचे संस्थापक व क्राईम ब्रँचचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तसेच समाजसेवक व वावंजे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच डी. बी. (धनराज) भाई म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमात डी. बी. भाई म्हात्रे यांच्या आगमनाची अनोखी शैली उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरली.

यावेळी अर्जुन गरड आणि डी. बी. भाई म्हात्रे यांनी अनंता ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, आनंद, समाधान आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.उपस्थित मान्यवरांनीही अनंता ठाकूर यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला सलाम करत त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. भावनिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थितांच्या मनात कायमस्वरूपी आठवणी निर्माण केल्या.

# मोरावे येथील मुरबा गणपती मंदिराचा वर्धापनदिन भक्तिभावाने उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मोरावे गाव येथील समुद्रात असलेल्या गणपती मंदिराचा वर्धापनदिन सोमवारी (ता. १) मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. सकाळच्या वेळेत गणेशपूजन आणि अभिषेक करण्यात आला. यावेळी गव्हाण-कोपर येथील श्री गुरुकृपा भजन मंडळाच्या गायिका सुप्रिया घरत-ठाकूर यांनी गणेशावर आधारित सुमधुर भजने सादर केली. त्यांना त्यांच्या सहकारी वादकांनी उत्तम साथ दिली. मुरबा गणपती ट्रस्टींनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधले होते; परंतु ते आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जिनिव्हा येथे असल्याने सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांच्या वतीने एम. जी. ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. महेंद्रशेठ घरत हे गणेशाचे निस्सीम भक्त असल्याने त्यांनी गणेशभक्तांचा समुद्रातील प्रवास सुखरूप व्हावा म्हणून १५ लाखांच्या दोन पॅसेंजर बोटी मुरबा गणपती देवस्थानला दान केल्या आहेत. त्यामुळे गणेशभक्त अतिशय आनंदाने पॅसेंजर बोटीतून प्रवास करून गणेशाचे दर्शन घेतात, फ्लेमिंगोंचा आनंद घेतात. सध्या कडक उन्हाळ्यामुळे सूर्य आग ओकत असतानाही छप्पर असणाऱ्या पॅसेंजर बोटींमुळे भक्तांचा प्रवास आनंदमयी झाला. त्यामुळे गणेशभक्तांनी महेंद्रशेठ घरत यांचे आभारही मानले. मुरबा गणपती देवस्थानचे ट्रस्टी शरद म्हात्रे, हेमंत पाटील, तेजस म्हात्रे, रितेश म्हात्रे यांनी वर्धापन दिनानिमित्त गणेशभक्तांची जय्यत तयारी केली होती. यावेळी गणेशभक्तांना महेंद्रशेठ घरत यांच्या जन्मोत्सवानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'सुखकर्ता' विशेषांकाचे वितरण करण्यात आले. तसेच सर्व गणेशभक्तांना महाप्रसाद देण्यात आला.

# प्लॅटिनमआरएक्सने १० लाख युजर्सचा टप्पा पार

## भारतीयांच्या औषधांच्या खर्चात १२८ कोटी रुपयांहून अधिक बचत केली

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

परवडणाऱ्या ब्रँडेड-जेनेरिक औषधे उपलब्ध करून देणाऱ्या भारतातील सर्वात विश्वासार्ह प्लॅटफॉर्म असलेल्या प्लॅटिनमआरएक्सने मोठा टप्पा गाठला असून देशभरातील १० लाखांहून अधिक रुग्णांना आपली सेवा दिली आहे. दर्जेदार जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देत कंपनीने ग्राहकांच्या औषध खर्चात एकूण १२८ कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे.मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजारांमुळे लाखो भारतीयांना दरमहा २,००० ते ५,००० रुपयांपर्यंत औषधांवर खर्च करावा लागतो. या वाढत्या खर्चामुळे ७० कोटींहून अधिक लोक औषधांचे डोस चुकवतात, औषधे पुन्हा घेण्यास उशीर करतात किंवा उपचार अर्धवट सोडतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्लॅटिनमआरएक्सची सुरुवात करण्यात आली. हा प्लॅटफॉर्म प्रत्येक औषधासाठी एक काळजीपूर्वक निवडलेला आणि उच्च दर्जाचा ब्रँडेड जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देतो. ही औषधे नामांकित फार्मा कंपन्यांकडून थेट घेतली जातात आणि त्यामध्ये मूळ ब्रँडेड औषधांप्रमाणेच १०० टक्के समान सॉल्ट कॉम्पोझिशन असते. परवानाधारक फार्मासिस्टमार्फत औषधे दिली जातात आणि भारतातील २० हजारांहून अधिक पिनकोडपर्यंत डिलिव्हरी केली जाते. मोठ्या शहरांमध्ये एका दिवसात, तर इतर भागांत १ ते ३ दिवसांत औषधे पोहोचवली जातात. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून रुग्ण गुणवत्ता आणि सुरक्षिततेत कोणतीही तडजोड न करता दर महिन्याला औषधांच्या खर्चात ५० ते ६० टक्के बचत करू शकतात.आशुतोष पांडे, सह-संस्थापक, प्लॅटिनमआरएक्स म्हणाले, भारतीय रुग्णांचे १२८ कोटी रुपये वाचणे हे आमच्यासाठी




केवळ आकडेवारी नाही, हे ते पैसे आहेत जे आता कुटुंबांच्या दैनंदिन गरजांसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि घरखर्चासाठी वापरले जात आहेत. औषधांच्या वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो आणि अनेकदा या गरजा मागे पडतात. आमचा विश्वास आहे की चांगल्या दर्जाची औषधे ही लक्झरी असू नयेत, प्रत्येकाला परवडणाऱ्या किमतीत मिळायला हवीत. आज जवळपास १० लाख कुटुंबांपर्यंत पोहोचल्यानंतर हा विचार मोठ्या बदलाचे रूप घेत आहे.प्लॅटिनमआरएक्सची स्थापना आशुतोष पांडे आणि पियुष कुमार यांनी केली. हे दोघेही अनुक्रमे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोलकाता येथील माजी विद्यार्थी आहेत. भारतात परवडणारी औषधे उपलब्ध असली तरी लोकांमध्ये विश्वास आणि योग्य माहितीची कमतरता आहे, या विचारातून त्यांनी कंपनी सुरू केली. रुग्णांमध्ये ब्रँडेड जेनेरिक औषधांचा वापर २०२४ मध्ये २२ टक्के होता, तो २०२५ मध्ये जवळपास दुपटीने वाढून ४० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. २०२६ अखेरीस हा आकडा ७० टक्क्यांहून जास्त होण्याची अपेक्षा आहे. या आकडेवारीवरून रुग्णांचा ब्रँडेड जेनेरिक औषधांवरील विश्वास हळूहळू वाढत असल्याचे दिसून येत आहे. दीर्घकालीन आजार असलेले रुग्ण दरमहा औषधांच्या खर्चात सरासरी १,५०० रुपयांची बचत करत आहेत.

# अल्पसंख्यांक संरक्षण कायदा लागू करा; मागणी विधान सभेत मांडण्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक समाजाच्या संरक्षणासाठी स्वतंत्र अल्पसंख्यांक संरक्षण कायदा लागू करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनाद्वारे अल्पसंख्यांक संरक्षण कायद्याची मागणी आगामी विधानसभेत प्रभावीपणे मांडावी, अशी विनंती करण्यात आली.

शिष्टमंडळाशी संवाद साधताना आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले की, मी नेहमी सर्व समाजघटकांच्या पाठीशी उभा राहिलो असून यापुढेही



राहणार आहे. अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी सरकारने यासंदर्भात तातडीने कायदा करण्याची आवश्यकता आहे. हा विषय शासनाच्या पातळीवर पोहोचवून विधानसभेत मांडण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन.अल्पसंख्यांक समाजावर होणारे वाढते हल्ले, द्वेषपूर्ण वक्तव्ये, दंगली आणि मॉब लिंचिंगसारख्या घटनांच्या पार्श्वभूमीवर समाजाच्या हक्क व सुरक्षेसाठी स्वतंत्र संरक्षण कायदा करण्याची गरज असल्याचे शिष्टमंडळाने यावेळी अधोरेखित केले.यावेळी अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीचे मुजतबा खान, प्रा. इलियास इनामदार, प्रा. शेख अमर, ॲड. जेबा शेख, शेख मुसा, ॲड. मोमीन अखिल, मुशीर इनामदार, शेख अखिल अण्णा, शेख मैनुद्दीन, पत्रकार पठाण अमरजान, सलीम खान, पाले खान, डॉ. मोसीन शेख, खदिरुज्जमा खान, शेख ऐहेतेशाम, सय्यद नबिलउज्जमा, ॲड. जावेद मणियार, अरफात खान,शामिर खान, आबेद कादरी, शेख खदीर, शेख नदीम, शाहनवाज खान, शेख मुशर्रफ, शेख जावेद,

शेख सलमान यांच्यासह अनेक सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोलगी येथील परिसरात पावसाळ्यापूर्वी घराची सारवण व दुरुस्ती करतांना महिला

### असे तयार होते घर

सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागातील घरे ही माती व लाकडापासून तयार होतात. अशा घरांचा वरती बांबूची चपटे असतात आणि त्यावर मातीचे कौल.घरांची भिंत तयार करण्यासाठी बांबूच्या चापट्या पासून बनविलेले तट्टे (कुड) वापरण्यात येतात,आता यासाठी कापसाच्या काड्यांचा वापर देखील करण्यात येत आहे. त्यावर माती, शेणाने सारवले जाते आणि मग आकर्षक असे घर तयार होते.

### मातीच्या घरांचे आकर्षण वाढले

सातपुड्याच्या परिसरात व पायथ्याशी असलेल्या विविध भागांमधील आदिवासी समुदायांची पारंपारिक घरे ही माती,शेण व कौलारू असतात आणि त्यांची रचना काँक्रीटच्या घरांपेक्षा चांगली असते. या मातीच्या घरात आरामदायक जीवन असते.शेणाने घराला सारवणे हे आरोग्यासाठी खूपच महत्त्वाचे असते आणि यामुळे अनेक रोगांपासून बचाव होतो असे आदिवासी जाणकार म्हणतात. त्यामुळे आता सर्वत्र मातीपासून तयार केलेल्या घरांचे आकर्षण वाढले आहे.



दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

अलीकडच्या काळात सिमेंटच्या घरांचे प्रमाण वाढले असले तरी सातपुड्याच्या ग्रामीण तसेच दुर्गम भागात मातीपासून तयार करण्यात आलेल्या कौलारू घरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाळा जवळ आल्याने गेल्या काही दिवसांपासून अशा कौलारू घरांची डागडुजी करण्याचे काम अनेकांनी हाती घेतले आहे. त्यामुळे या भागात सर्वत्र कौलारू घरांची दुरुस्तीची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.अलीकडे सिमेंटच्या घरांची क्रेज वाढल्याने अशा घरांचे प्रमाण वाढले असले तरी नंदुरबार जिल्ह्यातील विशेषतः सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागात आजही कुडाची व शेण मातीने सारवलेली घरे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात तर सर्वत्र माती पासून तयार केलेली झोपडी किंवा कौलारू घरचं नजरेस पडतात. पुढच्या महिन्यात पावसाळ्याला सुरुवात होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी अशा घरांची दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने, सध्या ग्रामीण भागात घरांची दुरुस्ती करतांना सर्वजण दिसून येत आहेत.

सातपुड्याच्या ग्रामीण किंवा अतिदुर्गम भागात जवळपास सर्वच घरे ही कौलारू व बांबू कुडाची शेण मातीने सारवलेली असतात.पावसाळा जवळ आल्याने अश्या अशा घरांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने, ग्रामीण भागात कौलारू घरांची दुरुस्ती करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. मात्र कौलारू घरे दुरुस्त करण्याचा अनुभव खूप कमी लोकांना असल्याने, संबंधित लोकांची मनधरणी करताना घरमालकाच्या नाकीनऊ येत असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. त्यामुळे घर मालक स्वतः कुटुंबाचा मदतीने प्रसंगी नातेवाइकांच्या मदतीने घराची दुरुस्ती करीत असल्याचे दिसून येत आहे. दुरुस्ती दरम्यान गाळ-मातीसह जीर्ण लाकूड बदलून,छतावरील कौलांची दुरुस्ती करण्यात येत आहे. प्रसंगी घरावर नवीन कौल लावणे व मोडकळीस आलेले लाकडी फाटे नव्याने बसविणे आदी कामे करण्यात येत आहेत.

आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्याठिकाणी पूर्वी खूपच मोठ्या प्रमाणात मातीचा घरं होती.पण आता ही मातीचे घरे कमी होत आहेत. त्यामुळे आदिवासी पारंपरिक भाव-भावना,मूल्ये, रीति-रिवाज, आचार,विचार आणि आरोग्यावर देखील याचा परिणाम होत असल्याचे चित्र आहे.या वर्षी उन्हाळा ४४ ते ४५ अंशा पर्यंत तापमान वाढल्याने लोकांना सिमेंटच्या घरातील उकाळ्यात राहणे कठीण होत असतांना ग्रामीण भगातील कौलारू आणि कुडाच्या घरातील राहाणारे लोकांना मात्र याची झळ बसत नाही.कौलारू आणि कुडाची घरे ही हवेशीर असतात.

–जोब्या वळवी
रहिवासी असली ता.धडगाव

# लोखंडी सळया चोरी करणाऱ्या चोरट्याला महिंद्रा पिकअपसह अटक; ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक वादळ वार्ता
**श्रीक्षेत्र राजुर । प्रतिनिधी**




हसनाबाद पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठी कारवाई करत लोखंडी सळया चोरी करून वाहतूक करणाऱ्या एका चोरट्याला महिंद्रा पिकअप वाहनासह ताब्यात घेत तब्बल ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ३१ मे २०२६ रोजी पहाटे करण्यात आली. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३० मे २०२६ रोजी रात्री गस्त घालत असताना हसनाबाद फाटा परिसरात एक संशयित महिंद्रा कंपनीचे पिकअप वाहन आढळून आले. वाहन थांबवून चालकाकडे चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. वाहनातील मालाबाबत तसेच वाहनाच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देत होता.यानंतर प्रभारी अधिकारी सपोनि योगेश डवळे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान चालक विजय बाबुराव पाखरे (वय ३६ वर्षे, रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना) याच्याकडे वाहनातील लोखंडी सळ्यांची कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. तसेच सळ्या चोरीच्या असल्याचा संशय बळावल्याने पंचांसमक्ष वाहन व माल जप्त करण्यात आला.

जप्त मुद्देमाल
महिंद्रा कंपनीचे पिकअप वाहन – किंमत अंदाजे ७,५०,०००
अंदाजे ४ टन वजनाच्या लोखंडी सळया – किंमत अंदाजे ३,५०,०००
एकूण जप्त मुद्देमाल : ११,००,०००

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात हा मुद्देमाल पो.स्टे. धाड (जि. बुलढाणा) हद्दीतून चोरीस गेलेला असल्याचे निष्पन्न झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबिरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, नितीन कटेकर उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत प्रभारी अधिकारी योगेश उबाळे तसेच सखाहरी तायडे मंगलसिंग सोळंके भरतकुमार चौधरी दुर्गेश राठोड दिपक सोनुने प्रकाश बोर्डे नारायण चरावंडे शंकर क्षिरसागर अनिल सवडे हसनाबाद पोलीस ठाण्याच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

हसनाबाद पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असून परिसरात या कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे.

# वाहन चालकानी वाहन सुरक्षित चालवावे

## अनेक ठिकाणी अपघाताच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत, आपली घरी कोणीतरी वाट पाहणार असतं याचा विचार करावा

दैनिक वादळ वार्ता

राज्यामध्ये सध्या सर्वत्र रस्त्याचे काम पूर्ण झाले असून अनेक वाहन चालक बेधुंद अवस्थेत, वेगाने वाहने चालवतात यामुळे अनेक अपघात होतात अपघात टाळण्याकरिता नियमाचे पालन करून वाहने सावकाश चालवावी, सेनगाव तालुक्यामध्ये एका महिन्यामध्ये अनेक अपघात झाले असून या अपघातामध्ये अनेक जणाचे मृत्यू झाले आहे, येलदरीच्या पुलावरून एक बोलेरो पिकपचा रात्री पूर्णा नदी पात्रात पडून एकाचा मृत्यू झाला त्यालाही घराची जबाबदारी व लहान लहान मुले होते, हिंगोली सेनगाव महामार्गावर मोटर सायकल व फोर व्हीलर चा अपघात झाला यामध्येही मृत्यू झालेल्या व्यक्तीला लहान लहान मुले होती घराचा प्रमुख असल्याने त्याचाही संसार उघड्यावर आला सेनगाव गोरेगाव महामार्गावर आजेगाव जवळ मोटरसायकल व फोर व्हीलर चा अपघात झाला मोटरसायकल स्वराचा जागीच मृत्यू झाला त्यालाही लहान लहान मुले होती, काल सेनगाव रिसोड महामार्गावर सेनगाव पासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावर दोन शिक्षकाचा मृत्यू झाला त्यांनाही लहान लहान



मुले होती, राज्यामध्ये सर्वत्र रस्त्याचे काम झाले असून अनेक वाहने हे वेगाने चालत आहे परंतु वेगाने चाललेल्या वाहनाचे नियंत्रण सुटून अनेक अपघात झाले आहेत आपली काळजी करणारं कोणीतरी घरी असते याची जाणीव न ठेवल्याने असे अपघात घडत आहेत आपली घरी कोणीतरी वाट बघतो याची काळजी मनामध्ये सतत ठेवून वाहने सावकाश चालून आपला प्रवास करावा जेणेकरून अपघात नियंत्रणात येतील आणि आपला प्रवास हा चांगल्या पद्धतीचा होईल सेनगाव तालुक्यामध्ये अनेक अपघात झाले या अपघातामध्ये अनेकांचे घर उघड्यावर आले मदतीला कोणीही येत नसतो सर्वकाही घरच्या व्यक्तींना सांभाळायचं असतं माणसाचा मृत्यू झाल्यानंतर सख्खा भाऊ ही व्यवस्थित राहत नसतो व घरच्या मुळाबालाचा सांभाळ करत नसतो याचीही काळजी घ्यायला पाहिजेत, जिवंत उदाहरण अनेक आहेत सक्का भाऊ कितीही जीव लावणारा असला तरीही एका वर्षाच्या पुढे सांभाळ होत नाही यामुळेच वाहन चालवताना आपल्या घरच्या मुलाबाळाचा पत्नीचा आई-वडिलांचा विचार करून शिस्तबद्ध वाहने चालवावी

आपला जीव अनमोल आहे जीवासोबत खेळायला पाहिजे नाही परंतु बेधुंद अवस्थेने वाहने चालवण्याने अनेक अपघात घडत असतात शासनाने दिलेल्या नियमाप्रमाणे वाहने सावकाश चालवून आपला प्रवास करावा आपली घरी कोणीतरी काळजी करणारे आहेत याचा सतत विचार करावा,

# लातूरच्या जागृती शुगर इंडस्ट्रीजला राज्य पातळीवरील सर्वोत्कृष्ट तांत्रिक संचालन व नवीनत्तम कार्याचा प्रथम पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

वेस्ट इंडियन शुगर मिल असोसिएशन (विस्मा) यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सर्वोत्तम तांत्रिक संचालन व नविनत्तम कार्य Technical Operation and innovation) मानाचा पुरस्कार लातूर जिल्ह्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज या कंपनीला शनिवारी शानदार सोहळ्यात पुणे येथे भारताचे केंद्रीय रस्ते ,वाहतूक , परिवहन मंत्री नामदार नितीनजी गडकरी व राजस्थानचे राज्यपाल महामहीम हरिभाऊजी बागडे यांच्या शुभ हस्ते जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे संचालक दिलीप माने सरव्यवस्थापक गणेश येवले यांनी पुरस्कार स्वीकारला या अत्यंत मानाच्या पुरस्कारामुळे राज्य पातळीवरील साखर उद्योगात लातूरच्या जागृती शुगर इंडस्ट्रीजचे नाव कोरले आहे राज्याचे माजी मंत्री सहकार तथा जागृति शुगर चे संस्थापक दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा व कार्यकारी संचालक गौरवी अतुलबाबा भोसले (देशमुख) यांच्या नेतृत्वाखाली गेली १६ वर्षापासून साखर कारखान्याची दैदिप्यमान वाटचाल सुरू आहे हे विशेष आहे .शनिवारी पुणे येथील वेस्ट इन हॉटेल कोरेगाव पार्क येथील भव्य दिव्य कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील राज्याचे माजी सहकार मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री नामदार शिवेंद्रसिंह राजे भोसले खासदार बजरंग सोनवणे साखर आयुक्त संजय कोलते ,बी बी ठोंबरे यांची उपस्थिती होती

**जागृती तशी प्रगती**

जागृती शुगर इंडस्ट्रीज मागच्या १६ वर्षाच्या गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात उसाचे गाळप करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी पेक्षा अधिक भाव देत या भागात शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता देण्याचा प्रयत्न केला असून हे करीत असताना माजी मंत्री सहकार महर्षी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने सूक्ष्म नियोजन करत पारदर्शकता ठेवून केवळ उस गाळप इतक्यावरच न राहता शुगर इंडस्ट्रीजने इथेनॉल, वीज, सी बी जी गॅस आदी विविध नवनवीन तंत्रज्ञान वापरून प्रकल्प हाती घेतले आहेत त्यामुळें शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अधिक उसाला योग्य भाव देण्यासाठी या साखर कारखान्याकडून मोठी मदत झाली असून राज्यात खाजगी साखर उद्योगात मराठवाडा आणि विदर्भ राज्यात कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक भाव देण्यात आघाडीवर राहिलेला आहे .

# इंग्रजकालीन स्वप्न साकारतेय!

## खामगाव-जालना रेल्वे मार्गासाठी भूमी अधिग्रहणाची अधिसूचना राजपत्रात प्रकाशित

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश; पंतप्रधान मोदी व रेल्वेमंत्री वैष्णव यांचे मानले आभार

दैनिक वादळ वार्ता
**जालना । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यासह मराठवाड्याच्या विकासाला नवी गती देणाऱ्या खामगाव-जालना रेल्वे मार्गाच्या उभारणीसाठी महत्त्वाचे पाऊल पडले असून, या प्रकल्पासाठी भूमी (जमीन) अधिग्रहणाची अधिसूचना केंद्र सरकारच्या राजपत्रात प्रकाशित झाली आहे. त्यामुळे अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळणार असल्याने बुलढाणा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या रेल्वे मार्गासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार तथा केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मध्य रेल्वे आणि सेंट्रल रेल्वे नेटवर्कला जोडणारा १६२ किलोमीटर लांबीचा खामगाव-जालना नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग प्रकल्प हा बुलढाणा जिल्ह्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीपैकी ५० टक्के हिस्सा महाराष्ट्र शासनाने उचलण्यास मान्यता दिली असून त्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्यानंतर केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

रेल्वे (सुधारणा) अधिनियम २००८ अंतर्गत केंद्र सरकारने जालना-खामगाव नवीन बीजी मार्ग प्रकल्प हा विशेष रेल्वे प्रकल्प म्हणून अधिसूचित केला आहे. या अधिसूचनेनुसार प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीचे अधिग्रहण करण्याचा मार्ग मोकळा झाला असून राष्ट्रीय पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी ही प्रक्रिया तातडीने राबविण्यात येणार आहे.



खामगाव-जालना रेल्वे मार्गाची मागणी इंग्रजकालापासून प्रलंबित होती. अनेक निवडणुकांमध्ये हा मुद्दा केंद्रस्थानी राहिला होता. २००९ मध्ये प्रथमच खासदार म्हणून निवडून आल्यानंतर प्रतापराव जाधव यांनी हा प्रश्न सातत्याने संसदेत उपस्थित केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आणि पुढे केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने प्रकल्पाला तत्त्वतः मान्यता मिळाली.

दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्य शासनाच्या विविध स्तरांवर झालेल्या पाठपुराव्यानंतर या प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली. त्यानंतर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

भूमी अधिग्रहणाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याने आता प्रत्यक्ष कामाच्या दिशेने मोठे पाऊल पडले असून, हा रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यानंतर बुलढाणा, जालना आणि परिसरातील उद्योग, व्यापार, कृषी माल वाहतूक तसेच प्रवासी सुविधांना मोठी चालना मिळणार आहे.

### दशकांपासूनची प्रतीक्षा अखेर संपणार

२०१४ मध्ये खामगाव येथील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खामगाव-जालना रेल्वे मार्ग पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. भूमी अधिग्रहणाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याने त्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याची भावना जिल्हावासीयांमधून व्यक्त होत आहे.

# विमा कंपन्यांविरोधात शेतकऱ्यांचा आक्रोश!

## नुकसान आमचे, विमा कुणाचा? म्हणत केजमध्ये गाऱ्हाणे पदयात्रा





### प्रीमियम भरला; न्याय मात्र मिळाला नाही!

**कोट्यवधी रुपयांचा पीक विमा प्रीमियम भरल्यानंतरही अनेक शेतकरी विमा लाभापासून वंचित असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. नुकसान आमचे, विमा कुणाचा? हा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांनी विमा कंपन्यांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.**

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

नुकसान आमचे, प्रीमियम आमचा आणि विमा कुणाचा? असा संतप्त सवाल उपस्थित करत केज, धारूर व माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोमवारी केज येथे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या निवासस्थानी वाजत-गाजत गाऱ्हाणे पदयात्रा काढून २०२५ च्या पीक विमा मंजुरीची जोरदार मागणी केली. शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा पार पडली.बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश परिस्थिती आणि विविध संकटांचा सामना करत पीक विमा योजनेत सहभाग घेतला. उपलब्ध माहितीनुसार जिल्ह्यातील ९० हजार ४१८ हेक्टर क्षेत्राचा पीक विमा उतरविण्यात आला असून शेतकऱ्यांनी तब्बल ५ कोटी २४ लाख ३९ हजार ८२० रुपयांचा प्रीमियम भरला आहे. मात्र एवढी मोठी रक्कम भरूनही अनेक शेतकऱ्यांना अद्याप अपेक्षित विमा मंजुरी मिळालेली नसल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी विमा कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही अनेक पात्र शेतकऱ्यांना विमा लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. विमा मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम जमा करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना देण्यात आलेल्या निवेदनात शेतकऱ्यांच्या विविध अडचणी मांडण्यात आल्या. केंद्र व राज्य शासन तसेच संबंधित विमा कंपन्यांकडे प्रभावी पाठपुरावा करून जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी शेतकऱ्यांनी भरलेल्या प्रीमियमच्या तुलनेत आणि प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीनुसार योग्य व न्याय्य पीक विमा मिळावा, हीच आपली प्रमुख अपेक्षा असल्याचे स्पष्ट केले. शासन आणि विमा कंपन्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.दरम्यान, खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवून मुख्यमंत्री यांची भेट घेणार असून पीक विम्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.या पदयात्रेमुळे केज शहरात काही काळ आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. आता प्रशासन आणि विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत काय निर्णय घेतात, याकडे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष गोविंद बापू ससाणे यांच्या पाठपुराव्याला यश

## सोनीजवळा शिवारातील लोडशेडिंग बंद



दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

सोनीजवळा शिवारातील शेतकरी आणि नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे.मागील सहा महिन्यांपासून या भागातील शेतकऱ्यांना रात्री ६ ते १० या वेळेत सिंगल फेज वीजपुरवठा उपलब्ध होत नव्हता.त्यामुळे दुधाळ जनावरांची धार काढणे,घरगुती कामे तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या.

या समस्येची गंभीर दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष गोविंद बापू ससाणे यांनी महावितरणच्या केज कार्यालयातील अभियंता सौ. शीतल सय्यद यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या अडचणी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवून रात्री ६ ते १० या वेळेत वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी त्यांनी लावून धरली होती.

या पाठपुराव्याची दखल घेत अभियंता शीतल सय्यद यांनी वरिष्ठ स्तरावरून आवश्यक मंजुरी मिळवून दिली.त्यानुसार २ जून २०२६ पासून रात्री ६ ते १० या वेळेतील लोडशेडिंग बंद करण्यात आले असून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.या निर्णयामुळे सोनीजवळा शिवारातील शेतकरी,दुग्धव्यवसायिक आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत गोविंद बापू ससाणे आणि महावितरण प्रशासनाचे आभार मानले आहेत.सोनीजवळा शिवारातील सर्व शेतकऱ्यांनी या बदलाची नोंद घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

## श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**



केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये थोर समाजसुधारक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या विषयी सविस्तर वृत्त असे की,तालुक्यातील ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाचे उच्च दर्जाचे शिक्षण देणारी श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये थोर समाज सुधारक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी सर्वप्रथम आहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी अभिवादन करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर गौरोवोद्गार काढले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या जेष्ठ शिक्षीका रेश्मा गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील शिक्षिका प्रियंका शिंदे,वैष्णवी काळे,सायली गायकवाड,संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते.यावेळी शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## = शिक्षणाची ज्योत =

**शिक्षण म्हणजे अज्ञानावर प्रकाशाचा वार;**
**गरीबाच्या आयुष्याला देत नव् आकार!**

**कष्टकऱ्यांच्या हाताला मिळते नवी ताकद;**
**ज्ञानामुळेच माणसात जागृती प्रगतीची उमेद!**

**बाबासाहेबांनी दिला शिक्षणाचा मार्ग महान;**
**शिका ;संघटित व्हा ;दिला संघर्षाचा मान!**

**पुस्तकांच्या पानात दडलं उज्वल उद्याचं स्वप्न;**
**शिक्षणामुळेच फुलत आयुष्याचं खरं धन!**

**जातीभेदांच्या भिंती ज्ञानाने कोसळतात;**
**माणुसकीचे नवे दीप शिक्षणातून पेटतात!**

**ज्ञानदीप सतत जळत राहो प्रत्येक घरात,;**
**बनसोडे सरांचा संदेश महान**
**शिक्षणाच्या प्रचारात,!**



**प्रा.ज्ञानेश्वर कृष्णाजी बनसोडे**
**साकुरी,ता.राहता,जि.अहिल्या नगर,**
**भ्रमणध्वनी - ९६०४७९७३१६**

## श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन मध्ये विद्यार्थी पालक मेळावा व गुणवंताचा गुणगौरव सोहळा सपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**



केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नामांकित ग्रामीणभागात उच्च दर्जाचे संगणक प्रशिक्षण देणाऱ्या श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन या प्रशिक्षण केंद्रात एम एस सी आय टी (MS-CIT) चे प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी व पालकांचा मेळावा व १० वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेतील परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याविषयी सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील चिंचोली माळी सारख्या ग्रामीण भागात एमकेसीएल चे अधिकृत अध्ययन केंद्र श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशनच्या माध्यमातून व एमकेसीलचे जिल्हा समन्वयक श्री. विठ्ठल पांचाळ सर यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या संगणकीय कोर्सेसच्या माध्यमातून संगणकीय साक्षरता मोठ्या प्रमाणात राबविण्याचे काम संचालक अनिल गलांडे हे करीत आहेत.त्याचाच एक भाग म्हणून सध्या एम एस सी आय टी (MS-CIT) करीत असलेल्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य व्यवसायात तसेच छोट्या मोठ्या नोकरीस उपयुक्त क्लीक (Klic) Knowledge lit Carrier कोर्सेस ची जनजागृती होऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ व्हावा म्हणून पालक मेळावा घेवून याविषयीं मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सौ.रेश्मा गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ.कोमल कापरे,सौ. प्रियंका शिंदे,सौ.वैष्णवी काळे,कु.सायली गायकवाड,श्री संस्कार एज्युकेशन ग्रुपचे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते.यावेळी बोलताना सर्व अध्यक्ष व सर्व प्रमुख पाहुणे यांनी संगणकीय शिक्षणाचे महत्व विषद केले व १० वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेतील संविधान शाहू तुपारे,रोहित महादेव गायकवाड,साक्षी संजय मेहरकर,स्वाती गोकुळ सारुक,फातेमा खाजा शेख,साक्षी दशरथ गव्हाणे या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुषपगुच्छ व सन्मानचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला तर किशोर विक्रम हांगे, राधाराणी मधुकर निंगुळे,तुळशीदास अशोक काळे,वैष्णवी राजाभाऊ माने,अभिषेक बालाजी राऊत,आदित्य बालाजी राऊत,तनुजा जगन्नाथ वनवे,श्रेया संजय शिंदे,सोनम कादिर पठाण,नाजिया जिलानी तांबोळी, आरशिया मुस्तफा तांबोळी,विराट सूर्यकांत घोडके,आदर्श उत्तरेश्वर तुपारे,मानसी दिपक बजगुडे,पूजा बालासाहेब मावकर,अभिषेक दीपक भांगे,शिवम भास्कर बर्डे, विश्वदीप वैजनाथ शिंदे, रेहान ऐंनोद्दीन शेख, वैष्णवी आश्रुबा बजगुडे, अर्पिता आश्रुबा बजगुडे या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व पदक देऊन सन्मान करण्यात आला. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी प्रशिक्षक अदित्य गलांडे,अमोल गलांडे, संचित गलांडे यांनी परिश्रम घेतले.या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांचे आ.रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

दैनिक वादळ वार्ता
**लातूर | प्रतिनिधी**

धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील भाजपाचे उमेदवार माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांचा सोमवारी धाराशिव येथे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला याप्रसंगी भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांची उपस्थिती होती.भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधान परिषद निवडणुकीतील धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून लातूर जिल्हा भाजपचे अध्यक्ष माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांना उमेदवारी दिली असून त्यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपा पक्षश्रेष्ठींनी अधिकृत उमेदवारी दिल्याबद्दल श्री. बसवराज पाटील यांचे यावेळी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

याप्रसंगी औसा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंदआण्णा केंद्रे, माजी आमदार ज्येष्ठ मार्गदर्शक सुरजीतसिंह ठाकुर, प्रदेश भाजपाच्या उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, या मतदार संघाचे माजी आमदार सुरेश धस, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, प्रदेश भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, विक्रमकाका शिंदे, जि.प. सदस्य महादेव साळुंके, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, राजकिरण साठे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077